महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आकृतिबंधामध्ये समाविष्ट असलेली ५९ पदे व आकृतिबंधात नसलेली ४६ पदे अशा एकूण १०५ अस्थायी पदांना दिनांक १.०३.२०१८ ते ३०.९.२०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ देणेबाबत ...

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक : मलोआ १११७ /प्र.क्र.२७२ /आठ

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : १६ मार्च, २०१८

<u>संदर्भ</u>

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.मलोआ १००५/८८८/प्र.क्र.५८/०५/ आठ, दिनांक ५.१०.२००६
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.मलोआ १००८/२६६/ प्र.क्र.८८/०८/आठ, दिनांक १७.०८.२०१० व २२.२.२०११
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र : मलोआ १११६/प्र.क्र२ ९० / आठ दिनांक २१.१२.२०१६.
४. शासन निर्णय क्रमांक मलोआ १५१७/प्र.क्र.२७२/आठ दिनांक २३ जानेवारी, २०१८.
५. शासन निर्णय, वित्त विभाग क्र : पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दिनांक ०५.०३.२०१८
६. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र.५२/अस्थायी पदे/२००३/पाच, दिनांक २२.०२.२०१८

<u>शासन निर्णय</u> :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील गट 'अ' ते 'ड' मधील २३५ पदांचा सुधारित आकृतीबंध या विभागाच्या संदर्भाधीन अ.क्र.(१) येथील शासन निर्णयान्वये निश्चीत करण्यात आला आहे. या पदांमध्ये ६६ अस्थायी पदांचा समावेश आहे. यानंतर संदर्भाधीन अ.क्र (२) येथील दिनांक १७.८.२०१० च्या शासन निर्णयान्वये अनुक्रमे ४४ अस्थायी पदे व दिनांक २२.२.२०११ च्या शासन निर्णयान्वये २ अस्थायी पदे अशी एकूण ४६ अस्थायी पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात आली आहेत. या विभागाच्या संदर्भाधीन अ.क्र.(४) येथील शासन निर्णयान्वये आकृतिबंधात समाविष्ट असलेली ६६ अस्थायी पदे व आकृतीबंधात समावेश नसलेली परंतू महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आस्थापनेवर निर्माण केलेली ४६ अस्थायी पदे यांना दिनांक १.१.२०१८ ते २८.२.२०१८ या कालावधीसाठी सुरु ठेवण्यास मंजुरी देण्यात आली होती.

२. वित्त विभागाच्या दिनाक १४.१.२०१६ च्या शासन निर्णयानुसार गट-ड संवर्गातील मंजूर पदांच्या २५ टक्के पदे निरसीत करण्याच्या निर्देशाप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आस्थापनेवरील ड संवर्गातील मंजूर ३९ पदांपैकी शिपाई संवर्गातील १० पदे या विभागाचा शासन निर्णय क्र. मलोआ-१११६/प्र.क्र.२९०/आठ दिनांक २१ डिसेंबर, २०१६ अन्वये निरसीत करण्यात आली आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संदर्भाधीन अ.क्र.(६) येथील पत्रास अनुसरुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आकृतिबंधात समाविष्ट असलेली ५९ अस्थायी पदे व आकृतीबंधामध्ये समावेश नसलेल्या ४६ अस्थायी पदे

अशी एकूण १०५ अस्थायी पदे दिनांक १.३.२०१८ ते ३०.९.२०१८ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :

आकृतीबंधामध्ये समाविष्ट असलेली ५९ अस्थायी पदे

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	पदांची संख्या
१	उप सचिव	रु.१५६००-३९१०० + ६६०० ग्रेड वेतन	२
२	अवर सचिव	रु.१५६००-३९१०० + ५००० ग्रेड वेतन	४
३	कक्ष अधिकारी	रु.९३००-३४८०० + ४४०० ग्रेड वेतन	६
४	सहायक	रु.९३००-३४८०० + ४३०० ग्रेड वेतन	३०
५	लघुलेखक (उच्चश्रेणी)	रु.९३००-३४८०० + ४४०० ग्रेड वेतन	२
६	लघुलेखक (निम्नश्रेणी)	रु.९३००-३४८०० + ४३०० ग्रेड वेतन	२
७	देयक लेखापाल	रु.५२००-२०२०० + १९०० ग्रेड वेतन	३
८	लिपिक-टंकलेखक	रु.५२००-२०२०० + १९०० ग्रेड वेतन	४
९	वाहनचालक	रु.५२००-२०२०० + १९०० ग्रेड वेतन	४
१०	हमाल	रु.४४४०-७४४० + १३०० ग्रेड वेतन	२
		एकूण :	५९

आकृतीबंधात समाविष्ट नसलेली ४६अस्थायी पदे

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	पदांची संख्या
१	सह सचिव	रु.१५६००-३९१०० + ७६०० ग्रेड वेतन	२
२	उप सचिव	रु.१५६००-३९१०० + ६६०० ग्रेड वेतन	१
३	अवर सचिव	रु.१५६००-३९१०० + ५००० ग्रेड वेतन	४
४	कक्ष अधिकारी	रु.९३००-३४८०० + ४४०० ग्रेड वेतन	१०
५	सहायक	रु.९३००-३४८०० + ४३०० ग्रेड वेतन	२०
६	लघुलेखक (उच्चश्रेणी)	रु.९३००-३४८०० + ४४०० ग्रेड वेतन	३
७	सिस्टिम ॲनालिस्ट	रु.९३००-३४८०० + ५००० ग्रेड वेतन	१
८	प्रोग्रॅमर	रु.९३००-३४८०० + ४३०० ग्रेड वेतन	२
९	डाटा एन्ट्री ऑपरेटर	रु.९३००-३४८०० + ४२०० ग्रेड वेतन	३
		एकूण :	४६

३. यासाठी येणारा खर्च मागणी क्रमांक ए-३, लेखाशीर्ष "२०५१-लोकसेवा आयोग, १०२ राज्य लोकसेवा आयोग, (००)(०१) महाराष्ट्र लोकसेवा आयोग (२०५१ ००१३), ०१ - वेतन (भारित)" याखालील सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर मान्यता ही वित्त विभागाने संदर्भाधीन अ.क्र. (५) येथील शासन निर्णय, क्र.पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क्र. दिनांक ५.३.२०१८ अन्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन देण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१६१३५४०००९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Pandurang Wagh

Digitally signed by Rajendra Pandurang Wagh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9e4468a63fe9f9f2a565a0790f46e3c14a3715b2370430433845720a9c4c8107, serialNumber=7adb1868a49b8719e27d3453044671a8ceddbd04af26dd2089ed03e6b1bd92bd, cn=Rajendra Pandurang Wagh
Date: 2018.03.16 13:58:07 +05'30'

(राजेंद्र वाघ)
अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.मुंबई
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई /निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४. सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-२५)
५. वित्त विभाग (व्यय-४/अर्थसंकल्प-१४/आ.पु.क.)
६. निवड नस्ती (कार्या.०८)